नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १५३ Issue - 153 | वार शनिवार दि. १९ ऑक्टोबर २०२४ Blow- Saturday Date 19 October 2024 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## जागा वाटप होईना ; महायुतीत चढाओढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून पक्षस्तरीय बैठका सुरू झाल्या आहेत. २०१९ पेक्षा यंदाची राजकीय गणितं आणि समीकरणं वेगळी आहेत. आचारसंहिता लागू होऊन चार दिवस उलटले तरी जागा वाटप जाहीर झालेलं नाही. तसंच, महायुती आणि महाविकास आघाडीकडून मुख्यमंत्री पदाचा चेहराही उलगडू दिलेला नाही. त्यामुळे महाराष्ट्राच्या गादीवर आता कोण बसणार असा प्रश्न निर्माण होतोय. मुख्यमंत्री पदाच्या चेहऱ्याबाबत महाविकास आघाडीत विसंगती असून महायुतीतही अंतर्गत धुसफूस सुरू असल्याचं सातत्याने समोर येतंय. दरम्यान, शिवसेना पक्ष (एकनाथ शिंदे) यांच्या पक्षस्तरीय बैठकीत नेत्यांनी एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर करा, अशी मागणी केली. नेते आणि खासदार श्रीकांत शिंदे यांनी ही बैठक बोलावली होती. या बैठकीला शिवसेनेचे ज्येष्ठ नेते मिलिंद देवरा, रवींद्र वायकर, मनीषा कायंदे, राहुल शेवाळे आदी नेते उपस्थित होते. एएनआय या वृत्तसंस्थेने याबाबत माहिती दिली.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदासाठी चेहरा म्हणून सादर करा, अशी जोरदार मागणी या बैठकीतून करण्यात आली. मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी करत भगवा झेंडा अभिमानाने फडकवत राहा, असं शिवसेना नेत्यांनी म्हटलं आहे. शिवसेना नेते आणि आमदार दिलीप लांडे यांनी मुख्यमंत्री शिंदे यांचे कौतुक करत नाथांचे नाथ, एकनाथ शिंदे आहेत, अशी घोषणाबाजी केली. तर, प्रकाश सुर्वे यांनी शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या नेत्यावंर ताशेरे ओढले.

फक्त एक महिना काम करायचं आहे. आपल्याला महाराष्ट्रात पुन्हा महायुतीचं सरकार आणायचं आहे. आपल्याला फक्त लोकांपर्यंत जाऊन सरकारी योजनांची माहिती द्यायची आहे. आज राज्यातील वातावरण अतिशय गढूळ आहे. काहीही असो. विरोधक कितीही शिव्या देऊ द्या, एकनाथ शिंदे यांच्यावर जनतेचे प्रेम आहे. चांदीचा चमचा घेऊन जन्माला आलेल्या लोकांना जनतेचे प्रश्न कळणार नाहीत, असं खासदार श्रीकांत शिंदे म्हणाले.

## राज्यात कुठेही बंडखोरी होणार नाही; महायुती समन्वयाने लढेल : एकनाथ शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सातारा : महायुतीमध्ये कोणताही वाद नाही. आम्ही एकत्रित निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. गेल्या दोन सव्वा दोन वर्षात रेकॉर्ड ब्रेक विकासकामे झाली आहेत. याची पोचपावती जनता मतपेटीतून दिल्याशिवाय राहणार नाही. दरम्यान, राज्यात कुठेही बंडखोरी होणार नाही. महायुती समन्वयाने लढेल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे महाबळेश्वर तालुक्यातील ढरे येथे आपल्या मूळ गावी ग्रामदैवताच्या दर्शनासाठी आले असता पत्रकारांशी बोलत होते. मी स्वतःला सीएम म्हणजे कॉमन मॅन समजतो. विरोधकांना पराभव समोर दिसू लागला की त्याचे खापर ईव्हीएमवर, निवडणूक आयोगावर फोडतात हे दुर्दैवी आहे, असेही शिंदेंनी सांगितले. गावच्या मातीत आल्यावर एक वेगळाच आनंद मिळतो. शेतीमध्ये, गोठ्यामध्ये आल्यानंतर गाईगुरांमध्ये फिरल्यानंतर एक वेगळी ऊर्जा व प्रेरणा मिळते व डबल इंजिनची ताकद येते. विधानसभेच्या निवडणुकांमध्ये महायुतीने केलेल्या कामाची पोचपावती महाराष्ट्रातील जनता दिल्याशिवाय राहणार नाही. कारण जेवढे काम केले जेवढे प्रकल्प पुढे नेले. जेवढ्या कल्याणकारी योजना राबवल्या, त्यामुळे जनता नक्कीच आम्हाला मतपेटीतून त्याची पोचपावती दिल्याशिवाय राहणार नाही.

जागा वाटपाची चर्चा नेमकी कुठून कुठपर्यंत आली व काही अदलाबदल होणार आहे का? यावर बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, कोण उभे राहते हे महत्त्वाचे नाही, तर शेवटी जिंकणं महत्त्वाचं आहे, कोणाला किती जागा द्यायच्या व कुठे कोणते उमेदवार द्यायचे हे आज उद्या दोन दिवसात ठरेल महायुतीमध्ये कोणताही वाद नाही. आम्ही जनतेचे काम करायचे हे एकच ध्येय घेऊन पुढे चाललो आहोत. विरोधकांच्या टीकेकडे आम्ही लक्ष देत नाही. त्यांचे टीका करणे हेच काम आहे.

### थोडक्यात

#### भारताच्या माजी अधिकाऱ्यावर आरोपपत्र

वॉशिंग्टन/न्यूयॉर्क : अमेरिकेने भारताच्या माजी सरकारी अधिकाऱ्यावर शीख फुटिरतावादी गुरपतवंतसिंग पन्नू याच्या हत्येचा प्रयत्न केल्याचा ठपका ठेवला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौऱ्यादरम्यान पुढे-मागे या हत्येचा कट होता, असे अमेरिकेने म्हटले आहे. विकास यादव (वय ३९) असे या सरकारी अधिकाऱ्याचे नाव आहे. अमेरिकेच्या न्याय विभागाने यादव याच्याविरोधात न्यूयॉर्क येथील न्यायालयात आरोपपत्र सादर केले आहेत.

## बाबा सिद्दीकी हत्याप्रकरणी आणखी पाच जणांना अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्या प्रकरणात गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत डोंबिवलीतील सराईत गुन्हेगार नितीन सप्रे याच्या टोळीचा सहभाग उघड झाला आहे. त्यानुसार, गुन्हे शाखेने सप्रेसह त्याच्या अंबरनाथ आणि पनवेल येथील साथीदारांना अटक केली आहे. आरोपींनी सिद्दीकी यांच्यावर गोळीबार करणाऱ्या आरोपींना शस्त्र पुरविल्याचे उघड झाले आहे. तसेच सिद्दीकी यांचे मारेकरी आरोपींसोबत कर्जत येथे वास्तव्यालाही होते, असे समजते.

डोंबिवलीतील सराईत गुन्हेगार नितीन सप्रे (३२) याच्यासह अंबरनाथमधील संभाजी पारधी (४४), प्रदीप दत्तू ठोंबरे (३७) चेतन दिलीप पारधी (२७) आणि पनवेलमधील राम फुलचंद कानोजिया (४३) यांना अटक करण्यात आली आहे. या टोळीचा सप्रे प्रमुख असून तो अकोटमधील पसार आरोपी शुभम लोणकरच्या संपर्कात होता. नितीनवर हत्या, हत्येचा प्रयत्न, शस्त्रबंदी कायद्यान्वये गुन्हे नोंद आहेत. नितीन हा रामच्या मदतीने त्याची टोळी चालवत होता. शस्त्रासंबंधी तो शुभम लोणकरच्या संपर्कात आला. शुभम पाठोपाठ तो याप्रकरणातील आरोपी मोहम्मद झिशान अख्तरच्या संपर्कात होता. त्यांच्या सांगण्यावरून तो या कटात सहभागी होता. त्याने साथीदारांच्या मदतीने तीन पिस्तुली मारेकऱ्यांना दिल्या. त्या गुन्हे शाखेने जप्त केल्या आहेत.

धर्मराज कश्यप आणि शिवकुमार गौतम उर्फ शिवा हे दोघे नितीन सप्रे व राम कनोजियासोबत ऑगस्ट महिन्यात एक दिवस कर्जतमधील एका झोपडीत वास्तव्याला होते.

या टोळीने त्यांना पैसेही पुरवले. पुढे सप्टेंबर महिन्यात आरोपींनी त्यांना शस्त्र पुरवले. त्यांच्या संपर्कात आणखी कोण आहे ? याचा तपास सुरू आहे. उत्तर भारतातून त्यांना शस्त्र मिळाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

अटक आरोपींच्या चौकशीतून या टोळीचा सहभाग स्पष्ट होताच गुन्हे शाखेने तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे या पाच जणांना अटक केली. याप्रकरणी गुन्हे शाखा अधिक तपास करीत आहे. याप्रकरणी आतापर्यंत आठ जणांना अटक करण्यात आली आहे. गोळीबार करणाऱ्यांपैकी धर्मराज कश्यप, गुरमेल सिंह या दोघांना घटनास्थळावरून अटक करण्यात आली होती.

## मुख्यमंत्री योजनादूत योजनेस निवडणूक आयोगाची स्थगिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सरकारने घेतलेले विविध कल्याणकारी निर्णय आणि योजना जनतेपर्यंत पोचविण्यासाठी महायुती सरकारने आणलेल्या 'मुख्यमंत्री योजनादूत' योजनेला निवडणूक आयोगाने शुक्रवारी स्थगिती दिली. आचारसंहिता काळात योजनादूत उघडपणे सरकारचा प्रचार करणार असल्याने त्याला स्थगिती देण्यात आल्याची माहिती आयोगातील उच्चपदस्थ सूत्रांनी दिली.

राज्य सरकारच्या विविध योजनांचा प्रचार, प्रसिद्धी करण्यासाठी तसेच या योजनांचा जास्तीत जास्त नागरिकांना लाभ मिळावा यासाठी त्यांना साह्य करण्यासाठी राज्यात ५० हजाह मुख्यमंत्री योजनादूत नेमण्याचा निर्णय सरकारने जुलैमध्ये घेतला होता. महिना १० हजार मानधनावर सहा महिन्यांसाठी योजनादूत नियुक्त करण्यात येणार होते. या योजनेच्या माध्यमातून तरुणांना रोजगारसंधी उपलब्ध करून देतानाच प्रत्येक ग्राम पंचायत क्षेत्रात एक आणि शहरी भागात पाच हजार लोकसंख्येमागे एक योजनादूत नेमण्यात येणार होते. सरकारने स्वपक्षीय कार्यकर्त्यांच्या सोयीसाठी ही योजना आणल्याची टीका त्यावेळी विरोधकांनी केली होती. प्रत्यक्षात मात्र महायुती सरकारची ही महत्वकांक्षी योजना पूरती फसल्याचे समोर आले आहे. या योजनेच्या माध्यमातून आतापर्यंत ५७४ ग्रामपंचायींमध्ये मुख्यमंत्री योजनादूत नियुक्त केले आहे. निवडणूक आयोगाच्या स्थगिती आदेशानंतर योजनादूतांमार्फत प्रचार प्रसिद्धीचे काम करण्यात येणार नाही. सद्यास्थितीत योजनादूतांमार्फत प्रचार प्रसिद्धीचे कोणतेही काम नसल्याने त्यांना कोणत्याही प्रकारचा आर्थिक मोबदला दिला जाणार नाही. यासंदर्भात जिल्हास्तरीय अंमलबजावणी यंत्रणांनाही सूचना देण्यात आल्याचे माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाने स्पष्ट केले आहे. महाविकास आघाडीने या योजनेच्या अंमलबजावणीला आक्षेप घेतला असून निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. त्याची दखल घेत आयोगाने या योजनेच्या अंमलबजावणीस स्थगिती दिली आहे. या योजनेच्या माध्यमातून मुख्यमंत्री योजनादूत सरकार म्हणजेच सत्ताधाऱ्यांचा उघड प्रचार करीत असल्याने तो सरळ आचारसंहिता भंग आहे. त्यामुळे या योजनेस स्थगिती देण्यात आली आहे. तरीही कोठे छुप्या पद्धतीने या योजनेची अंमलबजावणी होत असेल आणि कोणी तक्रार केली, तर कारवाई केली जाईल असा इशारा आयोगातील सूत्रांनी दिला.

## माळशिरस नगरपंचायत कर निर्धारण अधिकारी अँटी करप्शनच्या जाळ्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माळशिरस नगरपंचायतीचे कर निर्धारण अधिकारी श्री विकास गोरख पवार वय ३८ दीड हजार रुपये लाच घेताना अँटी करप्शन च्या जाळ्यात अडकले.

हकीगत अशी की बिनशेती जागेची नोंद घेऊन त्यांना मालमत्ता उतारा देण्यासाठी कर निर्धारण अधिकारी श्री विकास गोरख पवार निर्धारण अधिकारी माळशिरस नगरपंचायत माळशिरस यांनी शासकीय फी व घरपट्टी दीड हजार रुपयाची मागणी करून सदरची रक्कम त्यांच्या कार्यालयात स्वीकारल्यावरून भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा कलम सात प्रमाणे सोलापूर ग्रामीण येथे येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कार्यवाही लाच प्रतिबंधक विभाग पुणे श्री. शिरीष सर देशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक जानवे खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा पथकाचे प्रमुख लाच लुचपत प्रतिबंधक सोलापूर विभागाची पोलीस अधीक्षक उपाध्यक्ष श्री कुंभार पोलीस आमदार, सोनवणे, पोलीस हवालदार घुगे, चालक पोलीस हेड कॉन्स्टेबल गायकवाड यांच्या पथकाने ही कार्यवाही केलेली आहे.

### निवडणूक आयोगाला सोमवारपर्यंत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश

### महापालिकेच्या परिपत्रकाला आव्हान

## परीक्षाकाळात शिक्षकांना निवडणूक कामे हे मुलांच्या शिक्षणाच्या अधिकाराचे उल्लंघन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : परीक्षाकाळात शिक्षकांना निवडणूक कामे लावणे हे विद्यार्थ्यांच्या शिक्षण घेण्याच्या अधिकाराचे उल्लंघन आहे, असा दावा करून शिक्षकांना आगामी विधानसभा निवडणुकीची कामे लावणाऱ्या परिपत्रकाला पालकांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. न्यायालयानेही या याचिकेची दखल घेऊन निवडणूक आयोगाला सोमवारपर्यंत या याचिकेवर भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.



केंद्रीय निवडणूक आयोग आणि मुंबई महापालिकेने शिक्षकांना निवडणूक कामे लावणारी परिपत्रके काढली आहेत. या दोन्ही परिपत्रकांना कुर्ला येथील ग्रीन मुंबई प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांनी आव्हान दिले आहे. तसेच, शिक्षकांना या कामांतून वगळण्याची मागणी केली आहे. न्यायमूर्ती अतुल चांदूरकर आणि न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या खंडपीठासमोर ही याचिका सादर करण्यात आली. त्यावेळी, याचिकेवर भूमिका स्पष्ट करण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने न्यायालयाकडे वेळ मागितला. आयोगाची विनंती मान्य करून न्यायालयाने प्रकरणाची सुनावणी सोमवारी ठेवली.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या कामांसाठी शिक्षकांना मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. या कामांसाठी शिक्षकांना शाळेत तीन दिवस अनुपस्थित राहण्यास सांगण्यात आले आहे. परंतु, यामुळे, शाळेतील मुलांच्या शिक्षणात खंड पडत आहे, असा दावा याचिकेत करण्यात आला आहे. शिवाय, या निवडणूक कामांचे स्वरूप लक्षात घेतले तर शिक्षकांना विश्रांतीविना सलग तीन दिवस हे काम करावे लागणार आहे. परिणामी, ते शारीरिकदृष्ट्या थकतील आणि त्यामुळे शाळेत कार्यरत असताना मुलांना शिकवण्याच्या त्यांच्या प्राथमिक जबाबदारीपासून दूर जातील, असा दावाही याचिकाकर्त्यांनी केला आहे.

मुलाच्या शिक्षणात व्यत्यय आणणे हे घटनेच्या कलम २१ अ अंतर्गत शिक्षणाच्या अधिकाराचे उल्लंघन असल्याचा दावा देखील याचिकेत करण्यात आला आहे. मोठ्या प्रमाणात सरकारी कर्मचारी असताना शिक्षकांना वारंवार बीएलओ म्हणून नियुक्त केले जाते, त्यामुळे, शिक्षकांना अध्यापनाच्या वेळेत शाळांमधून जास्त कालावधीसाठी अनुपस्थित राहावे लागत असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. सरकारी आणि महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थी हे प्रामुख्याने कमी उत्पन्न गट आणि असुरक्षित पार्श्वभूमीतून आलेले असतात. त्यामुळे, त्यांचे शिक्षण आणि विकास हा शिक्षकांवर अवलंबून असतो. ही बाब लक्षात घेता निवडणूक कामे लावल्याने शिक्षकांच्या शाळेतील अनुपस्थितीने विद्यार्थ्यांवर विपरीत परिणाम होईल, असेही याचिकाकर्त्यांनी याचिकेत म्हटले आहे.



## संपादकीय....

### हत्येची उकल

माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्या प्रकरणात गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत डोंबिवलीतील सराईत गुन्हेगार नितीन सप्रे याच्या टोळीचा सहभाग उघड झाला आहे. त्यानुसार, गुन्हे शाखेने सप्रेसह त्याच्या अंबरनाथ आणि पनवेल येथील साथीदारांना अटक केली आहे. आरोपींनी सिद्दीकी यांच्यावर गोळीबार करणाऱ्या आरोपींना शस्त्र पुरविल्याचे उघड झाले आहे. डोंबिवलीतील सराईत गुन्हेगार नितीन सप्रे (३२) याच्यासह अंबरनाथमधील संभाजी पारधी (४४), प्रदीप दत्तू ठोंबरे (३७) चेतन दिलीप पारधी (२७) आणि पनवेलमधील राम फुलचंद कानोजिया (४३) यांना अटक करण्यात आली आहे. या टोळीचा सप्रे प्रमुख असून तो अकोटमधील पसार आरोपी शुभम लोणकरच्या संपर्कात होता. नितीनवर हत्या, हत्येचा प्रयत्न, शस्त्रबंदी कायद्यान्वये गुन्हे नोंद आहेत. नितीन हा रामच्या मदतीने त्याची टोळी चालवत होता. शस्त्रासंबंधी तो शुभम लोणकरच्या संपर्कात आला. शुभम पाठोपाठ तो याप्रकरणातील आरोपी मोहम्मद झिशान अख्तरच्या संपर्कात होता. त्यांच्या सांगण्यावरून तो या कटात सहभागी होता. त्याने साथीदारांच्या मदतीने तीन पिस्तुली मारेकऱ्यांना दिल्या. त्या गुन्हे शाखेने जप्त केल्या आहेत. अटक आरोपींच्या चौकशीतून या टोळीचा सहभाग स्पष्ट होताच गुन्हे शाखेने तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे या पाच जणांना अटक केली. याप्रकरणी गुन्हे शाखा अधिक तपास करीत आहे. याप्रकरणी आतापर्यंत आठ जणांना अटक करण्यात आली आहे. गोळीबार करणाऱ्यांपैकी धर्मराज कश्यप, गुरमेल सिंह या दोघांना घटनास्थळावरून अटक करण्यात आली होती. तसेच त्यांना मदत करणाऱ्या प्रवीण लोणकरला गुन्हे शाखेने पुण्यातून अटक केली होती. याप्रकरणी गोळीबार करणारा शिव कुमार ऊर्फ शिवा गौतम याच्यासह आरोपींना मदत करणारा मोहम्मद झिशान अख्तर व कटात सहभागी शुभम लोणकर यांचा शोध सुरू असून त्यांना पकडण्यासाठी पोलिसांनी लुक आऊट सर्क्युलर जारी केले आहे.

# बौध्द धम्माचे आचरण केल्यास मानवाला सुखी समाधानी आणि सुंदर जिवन जगता येते





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड) : बौध्द धम्म हा केवळ स्विकारण्यासाठी नसून धम्माचे आचरण करणे महत्त्वाचे आहे.तेंव्हा तथागत भगवान गौतम बुद्ध यांनी बौद्ध धम्माच्या माध्यमातून दिलेल्या पंचशील तत्वाचे प्रत्येकानी पालन केल्यास अर्थात बौद्ध धम्माचे आचरण केल्यास मानवाला सुखी समाधानी आणि सुंदर जिवन जगता येते. असे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेचे बौद्धाचार्य गुणवंत सोनवणे यांनी वागदरी ता.तचळजापूर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना केले.

आश्विन पौर्णिमा वर्षावास समापन दिन व ६८ धम्म चक्र प्रवर्तन दिनाचे औचित्य साधून पंचशील बौद्ध विहार कमिटी वागदरी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी वागदरी सह समस्त बौद्ध बांधवांच्या वतीने बुद्ध वंदना व धम्म देशना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी गुणवंत सोनवणे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हा अध्यक्षा राजश्री कदम ह्या होत्या तर प्रमुख पाहूणे म्हणून भारतीय बौद्ध महासभा संस्कार विभागाचे धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष विजय बनसोडे, बौद्धाचार्य गुणवंत सोनवणे,धाराशिव तालुका अध्यक्ष उमाजी गायकवाड. आदी उपस्थित होते.

प्रारंभी भारतीय बौद्ध महासभा धाराशिव जिल्हा शाखेच्या वतीने धाराशिव येथे आयोजित श्रामनेर बौद्धाचार्य शिबीरातील

## गुणवंत सोनवणे यांचे प्रतिपादन

श्रामनेर संघा समवेत गावातील मुख्य रस्त्यावरून धम्म संदेश फेरी काढण्यात आली.या फेरीची सांगता येथिल पंचशील बुद्ध विहारात करून भारतीय बौद्ध महासभा धाराशिव जिल्हा अध्यक्षा राजश्री कदम,उपासिका उज्वला वाघमारे, गीताबाई झेंडारे यांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून सामूहिक रित्या बुद्ध वंदना घेण्यात आली.तर येथील समाज मंदिर सभागृहात जेष्ठ कार्यकर्ते उत्तम झेंडारे व संदीपान वाघमारे यांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध आणि महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून धम्म देशना (प्रवचण) कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळीअध्यक्षिय स्थानावरून बोलताना राजश्री कदम म्हणाल्या की धम्म चळवळीत महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला पाहिजे.बौध्द धम्माच्या प्रचार आणि प्रसार करण्यासाठी प्रत्येक गावा गावात धम्म दिक्षा कार्यक्रमाचे आयोजन करणे ही काळाची गरज आहे.यावेळी संस्कार विभागाचे धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष विजय बनसोडे यांचेही मार्गदर्शन पर भाषण झाले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन एस.के. गायकवाड यांनी केले. या वेळी माजी सरपंच तथा पंचशील बुद्ध कमिटी वागदरीचे अध्यक्ष नागनाथ बनसोडे, अनिल वाघमारे, महादेव वाघमारे,भिम शाहीर शिवाजी वाघमारे, दिपक वाघमारे, गुरूनाथ वाघमारे, दत्तात्रय वाघमारे, नामदेव वाघमारे, हणमंत वाघमारे, दत्ता झेंडारे बाबासाहेब वाघमारे, वंदना वाघमारे, कविता गायकवाड, सुगंधा वाघमारे, विजयाबाई वाघमारे, मुक्ताबाई वाघमारे,स्वाती गायकवाड, ठकुबाई वाघमारे, कोमल झेंडारे, कांताबाई ईरेश वाघमारे, कमळाबाई वाघमारे,शिक्षाबाई रमेश जेटीथोर सह महिला,ग्रामस्थ, युवा कार्यकर्ते व श्रामनेर संघातील सर्व श्रामनेर शिबिरार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# योजनेतून मिळालेली रक्कम परस्पर काढून फसवणूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) योजनेतून मिळालेली रक्कम परस्पर काढून फसवणूक केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १ ऑगस्ट २०२४ ते १५ ऑक्टोंबर २०२४ दरम्यान घडली.याप्रकरणी मोहन राजू आयगोळे (वय-२१-,रा. जगजीवन राम झोपडपट्टी) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून यजरा सेतालालू (रा.सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,वरील संशयित आरोपी हा फिर्यादी मोहन यांचा ओळखीचा असून,त्याने गेल्या दोन वर्षांपूर्वी फिर्यादीकडे येऊन फिर्यादीस तुझे आई-वडील मयत झाले आहे.

तुला महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ योजनेतून प्रत्येकी ६० लाख रुपये काढून देतो असे म्हणून फिर्यादी कडून आधार कार्ड, लेबर कार्ड,रेशन कार्ड,बँक पासबुक घेऊन बांधकाम भवन दमानी नगर येथे घेऊन जाऊन तेथे फिर्यादी यांची सही व अंगठा घेतला.त्यानंतर मोदी येथे असलेल्या एटीएम मधून फिर्यादी यांच्या खात्यातून २५ हजार रुपये काढून घेऊन फिर्यादीच्या मोबाईल द्वारे एक लाख रुपये फोन पे द्वारे पाठवले.तसेच पुन्हा एटीएम मधून २५ हजार रुपये काढून घेतले.अशा प्रकारे फिर्यादी यांची आई बस्समा यांचा मृत्यू झाल्याने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ योजनेतून दोन लाख दहा हजार रुपये मंजूर झाले असताना त्यातील वरील संशयित आरोपी याने रोख रक्कम ५० हजार रुपये व एक लाख रुपये फोन पे द्वारे ट्रान्सफर करून घेऊन फिर्यादी मोहन आयगोळे यांची फसवणूक केली आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.या घटनेचा पुढील तपास पोसई.शिंदे हे करीत आहेत.

# अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया व रक्तदान शिबिराचे आयोजन




**दैनिक यश सिध्दी न्युज नेटवर्क**

बुलढाणा/जिल्हा प्रतिनिधी : मानवाने विज्ञानातील प्रगतीच्या जोरावर सर्व काही साध्य केले आहे मात्र रक्त निर्मिती करता आलेली नाही. अशातच राज्यात व जिल्ह्यात रक्ताचा तुटवडा निर्माण होत असतो. हि परिस्थिती लक्षात घेता तथागत बहुउद्देशीय संस्था, मेहकर द्वारा आयोजित, तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य सामाजिक संघटना, राजमाता माँ जिजाऊ स्वयंसहायता महिला बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने मेहकर येथे भव्य रक्तदान व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी मेहकर व लोणार तालुक्यातील सर्व रक्त दात्यानी २७ ऑक्टोंबर रोजी सकाळी नऊ ते बारा वाजेपर्यंत डॉ बाबासाहेब आंबेडकर वाटीका अशोका हॉल मेहकर येथे रक्तदान करावे.व अल्प दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे तथागत बहुउद्देशीय संस्था संस्था मेहकर व्दारा.व तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य सामाजिक संघटना. राजमाता जिजाऊ स्वयंसहाय्यता महिला बचत गट व जिजामाता हॉस्पिटल महीला आरोग्य केंद्र सिंदखेडराजा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन केले आहे . तथागत बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संदीप गवई यांनी आवाहन केले आहे.

# बिसी चालकाच्या त्रासाला कंटाळून पत्नी, मुले, कापडाचे दुकान व घर सोडून पती बेपत्ता



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : बिगवन शहरात कापडाचा व्यवसाय करणारे संदिप गुंदेचा हे दुकानातील कामगार सचिन हनुमंत जाधव रा थोरातनगर भिगवन ता इंदापुर जि पुणे याला मी बाहेर जावुन आलो असे सांगुन कोठेतरी गेले आहेत ते अद्याप परत आले नाहीत असे संदिप गुंदेचा यांच्या पत्नी ने दाखल केलेल्या तक्रारीत म्हटले आहे

तर संदिप गुंदेचा यांनी लिहिलेली चिठ्ठी ही सापडली असून त्या चिठ्ठीत त्यांनी बिसीचालक व इतरांच्या त्रासाला कंटाळून मी निघुन जात आहे असे लिहिलेले आहे .मी त्यांचे फोनवर वारंवार फोन केले परंतु त्यांचा फोन लागत असुन ते फोन उचलत नाही असे संदिप गुंदेचा यांच्या पत्नीने तक्रारीत म्हटले आहे .

१/१०/२४ रोजी आमचे दुकानात सकाळी ९/३० ते १०/०० वा दरम्यान काउंटरवर साफसफाई करीत असताना नंबर २ च्या गाळाच्या काउंटरच्या ड्रावरमध्ये एक चिठ्ठी मिळाली असुन त्या मध्ये त्यांनी आर्थिक अडचणीमुळे मी घर सोडुन जात आहे व मी त्याबद्दल घरातील कोणालाही काही सांगीतलेले नाही असे लिहिलेले आहे.

मी स्वताः खुप अडचनीत आहे त्याचे कारण सावकारी व बिसि मुळे मी खुप टेन्शन मध्ये आहे बिसीवाले व सावकार मला खुप त्रास दर आहे तसेच बिसिवाले मला १०% (दहा टक्के व्याजाने बिसिमध्ये भरत आहे बिसी न भरल्यास मला दादागिरी व मारायची भाषा करत आहे .

दमदाटी व दादागिरी करणारे नावे हे पुढील प्रमाणे पद्माकर कदम (विमल), रोहण, पद्माकर कदम, लहू घोलप, प्रतिक घोलप, बापू सूर्यवंशी हे सावकार व बिसिचालक पैसासाठी खुप त्रास देत आहेत. व शिवीगाळ करत आहे सावकारी व बिसिमुळे माझे ३० लाख (तिस लाख) चे नुकसान झाले आहे.

विमल पद्माकर कदम, रोहन पद्माकर कूदम, पद्माकर कदम, लहू घोलप, प्रतिक घोलप, बापू सुर्यवंशी हे सावकार चालक बाहेरच्या गुंडांना आणून दमदाटी व मारायची भाषा करत आहे असे चिठ्ठीत लिहलेले आहे. दि १ / १०/२४ रोजी माझे पती संदिप मिठुलाल गुंदेचा हे आमचे दुकानातील कामगार सचिन हनुमंत जाधव यांना मी परत येतो असे सांगुन गेले ते अद्यापर्यंत घरी आले नाहीत .

दुकानातील कामगार लोकांनी भिगवण व आजुबाजुचे परीसरामध्ये तसेच नातेवाईक यांचेकडे चौकशी केली असता ते अद्यापपर्यंत मिळुन आले नाहीत.

वर्णन खालीलप्रमाणे नावः- संदिप मिठुलाल गुंदेचा वय ४४ वर्षे रा.थोरातनगर ताराही बिल्डींग, फ्लॅट नं १३ भिगवण ता. इंदापुर, जि, पुणे, रंग गोरे, उंची ५ फुट २ इंच, चेहरा गोल, अंगात नेसणिस शर्ट निळसर त्यावर मोराचे पिसारा डिझाईन्स पँन्ट आरमानी निळे रंगाची, पायात चप्पल आहे.

# विठाबाई गायकवाड यांचे निधन


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट/ प्रतिनिधी : मौजे गोगाव येथील भीमनगर मधील स्वातंत्र सैनिक महादेव धर्मा गायकवाड यांचे धर्मपत्नी समाज सेवक दत्तात्रय गायकवाड यांचे मातोश्री विठाबाई महादेव गायकवाड यांची अल्पशा आजाराने निधन झाले आहे

मयत आज शनिवार दि. १९/१०/२०२४ सकाळी अकरा वाजता बेगर वस्ती गोगांव ता. अक्कलकोट येथून निघणार आहे

# सामाजिक कार्यकर्ते संतोष दराडे यांना राज्यस्तरीय समाज गौरव सेवा कार्य पुरस्कार जाहीर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी/ राहुल साबळे : सिंदखेडराजा तालुक्यातील हिवरखेड पूर्णा येथील सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे युवा कार्यकर्ते संतोष अंबादास दराडे यांची राज्यस्तरीय समाज गौरव सेवा कार्य पुरस्कारासाठी निवड झाली आहे .त्याबाबतचे पत्र अनुश्री महिला बहुउद्देशीय संस्था येथील अध्यक्षा सौ जयश्रीता इंगळे यांनी दिली आहे . संतोष दराडे कष्टकरी शेतकरी विधवा ' विद्यार्थी तसेच शोषित पीडित समाजातील घटकांना न्याय देण्याकरता नेहमीच आंदोलने शासकीय स्तरावर पाठपुरावा करत असतात ,अनेकांना ती मदत सुद्धा करत असतात याच कार्याची दखल घेण्यात आली आहे . दराडे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे .

# माजी नगरसेवक नाना बागुल आणि सिंधी समाजाचे नेते नंदलाल वाधवा यांचा रिपब्लिकन पक्षात जाहिर प्रवेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनीधी : आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ कार्यकर्ते माजी नगरसेवक नाना बागुल यांनी आज आपल्या समर्थकांसह रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले) या पक्षात आज जाहिर प्रवेश केला. तसेच सिंधी समाजाचे ज्येष्ठ नेते नंदलाल वाधवा यांनी ही आज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले) या पक्षात जाहिर प्रवेश केल्याची अधिकृत घोषणा आज मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित पत्रकार परिषदेत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केली.

यावेळी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर,रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस ,ठाणे प्रदेश निरिक्षक सुरेश बारशिंग, युवक आघाडी महाराष्ट्र अध्यक्ष पप्पू कागदे, प्रसिद्धी प्रमुख हेमंत रणपिसे, महिला आघाडी राज्य अध्यक्षा चंद्रकांता सोनकांबळे, मुंबई प्रदेश अध्यक्ष सिध्दार्थ कासारे , उषाताई रमलू , आशाताई लांडगे, अभयाताई सोनवणे, माजी नगरसेवक नाना बागुल, सिंधी समाज ज्येष्ठ नेते नंदलाल वाधवा, आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी केंद्रीय राज्यमंत्री ना .रामदास आठवले यांच्या शुभहस्ते माजी नगरसेवक नाना बागुल आणि नंदलाल वाधवा यांचे पुष्पगुच्छ देऊन रिपब्लिकन पक्षात स्वागत करण्यात आले.



माजी नगरसेवक नाना बागुल हे उल्हासनगर मधील आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते आहेत.यांचा राजकीय, सामाजीक आणि प्रशासकीय प्रदीर्घ अनुभव आहे.उल्हासनगर आणि ठाणे जिल्हातल्या राजकारणात एक मातब्बर नेते आहेत.त्यांच्या कुंटुंबात त्यांच्या पत्नी आणि मुलगा नगरसेवक आहेत.उल्हासनगरच्या राजकीय घडामोडींचा त्यांना प्रंचड अनुभव आहे.या पूर्वी त्यांनी रिपब्लिकन पक्षात जिल्हा अध्यक्ष म्हणुन काम केले होते.भारतीय दलित पँथर पासुन ते आंबेडकरी चळवळीत कार्यरत आहेत. केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वावर आपला अतुट विश्वास असल्याने आपण रिपब्लिकन पक्षात जाहिर प्रवेश केल्याचे मनोगत नाना बागुल यांनी यावेळी व्यक्त केले.

माजी नगरसेवक नाना बागुल यांच्या पक्ष प्रवेशामुळे उल्हासनगर आणि ठाणे प्रदेश मध्ये रिपब्लिकन पक्षाला बळकटी मिळेल असा विश्वास ना.रामदास आठवले यांनी व्यक्त केला.

सिंधी समाजाचे ज्येष्ठ नेते नंदलाल वाधवा हे उल्हासनगर मधील यशस्वी उद्योजक आणि ज्येष्ठ समाजसेवक म्हणुन कार्यरत आहेत.त्यांना ४५ वर्षापेक्षा जास्त उद्योग व्यवसाय आणि सार्वजनिक जिवन यांचा अनुभव आहे.भानुशाली रोलर फ्लोअर मिल,स्वामी शांती प्रकाश गुडस्,आणि मीलन ग्रुपचे ते चेअरमन आहेत.सिंधी समाजासहित सर्व समाजात समाजसेवेचा त्यांना दिर्घ अनुभव आहे.केंद्रिय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांच्या नेतृत्वाचे ते चाहते असल्याने आज त्यांनी रिपब्लिकन पक्षात ना.रामदास आठवले यांचे शुभ आर्शीवाद घेऊन रिपब्लिकन पक्षात जाहिर प्रवेश केला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### पोलीस कॉन्स्टेबलच्या अंगावर जाऊन शर्टाची कॉलर पकडली ; तिघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) पोलीस कॉन्स्टेबलच्या अंगावर जाऊन शर्टाची कॉलर पकडून सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १६ ऑक्टोबर रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास मार्केट यार्ड येथे घडली.याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल बालाजी लक्ष्मण भंडारवाडा (नेमणूक शहर वाहतूक शाखा उत्तर विभाग) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संतोष संजय कांबळे (वय-३९), मल्हारी सतीश काळे (वय-२७) व रोहित परमेश्वर कांबळे (वय-२९,सर्व राहणार सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी हे वाहतूक नियमांचे सरकारी कर्तव्य करीत असताना वरील संशयित आरोपी यांनी दुचाकी क्रमांक एमएच.१३. ई.एल.९५२२ वरून ट्रिपल सीट मार्केट यार्ड येथील गर्दीतून पुणे रस्त्याकडे जात होते. त्यावेळी त्यांना थांबवण्याचा इशारा केला असता ते न थांबता पुढे जात असताना फिर्यादी यांनी थांबवून पोलिसांनी दिलेल्या आदेशाचे उल्लंघन का करता अशी विचारणा केली.त्यावेळी फिर्यादी यांना वरील संशयित आरोपी यांनी अरेरावी करीत अंगावर धावून येऊन फिर्यादी यांच्या वर्दीच्या शर्टाची कॉलर पकडली व तसेच तुला बघून घेतो असे म्हणून त्यातील संतोष कांबळे याने दारूच्या नशेत त्याच्या खिशातील ब्लेड काढून स्वतःहून हातावर वार करून जखमी झाला.तसेच फिर्यादी करीत असलेल्या सरकारी कर्तव्यात अडथळा आणल्याचे फिर्यादीत नमूद आहे.या घटनेचा पुढील तपास पोसई.डेरे हे करीत आहेत.

# ठाणे महापालिकेच्या घनकचरा प्रकल्पास नागरीकांचा विरोध

## कचरा आणल्यास आंदोलनाचा इशारा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी तालुक्यातील पडघ्याजवळील आतकोली येथील ठाणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास परिसरातील नागरीकानी कडाडून विरोध केला आहे.

आतकोली येथील ८४ एकर गुरचरण जमीनीवर ठाणे महानगर पालिकेच्या वतीने घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविण्यात येणार असून ठाणे शहरातील कचरा येथे आणुन त्यावर त्यावर प्रक्रिया करणार आहेत त्याबाबत पोलीस प्रशासनाच्या मध्यस्थीने ठाणे महापालिका अधिकारी व परिसरातील नागरीकांची समन्वय सभा पडघा येथील ग्रामसचीवालय सभागृहात घेण्यात आली.

यावेळी ठाणे शहरातील कचरा येथे आणुन एका टप्प्यात कचऱ्याचे वर्गीकरण व दुसऱ्या टप्प्यात हरीत कोळसा निर्मीत प्रकल्प राबविण्यात येणार असून शास्त्रोक्त पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावली जाणार असल्याचे सांगण्यात आले तर या प्रकल्पा शेजारीच गावे, घरे, शेती असुन जवळच क्रीडांगण ठाणे ग्रामीणचे पोलीस मुख्यालय, वसाहत, जेल साठी जमीन प्रस्तावित केली असुन जवळच नदी, आहे या घनकचरा प्रकल्पामुळे परिसरात त्यांचे प्रदुषण, दुष्परिणाम दिसणार असुन हजारो एकर जमीनींवरील विकास खुंठणार असल्याचे सभेत उपस्थित शिवसेना उपनेते प्रकाश पाटील आमदार शांताराम मोरे समाजसेवक भगवान सांबरे यांनी सांगितले तर हा घनकचरा प्रकल्प डोंगराच्या कडेला अथवा इतरत्र जमीनीवर हलवण्याची मागणी नागरिकांनी केली.

तसेच आचारसंहिता काळात पोलीस बंदोबस्त घेऊन कचरा आणण्यास ठाणे महापालिकेने सुरूवात केल्यास विरोध करुन संघर्ष करणार असल्याचा इशारा स्थानिक शेतकरी रमेश शेलार व उपस्थीत नांगरीकानी दिला.

यावेळी उपस्थित अप्पर पोलीस अधीक्षक भारत ताडकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी ठाणे महापालिकेचे उपायुक्त जोशी, स्थानिक गुन्हे शाखेचे सुरेश मनोरे पडघा पोलीस निरीक्षक बांळा कुंभार सह शिवसेना उपजिल्हाप्रमुख विष्णुदादा चंदे, विलास पाटील, योगेश पाटील, विलास भोईर, भास्कर माळी, डॉ. निवृत्ती मगर, विजय पाटील, विश्वास सपाट, जगदीश राऊत, नितीन राऊत, अक्षय भोईर, संदीप शेलार, परिसरातील सर्वपक्षीय पदाधिकारी नागरीक स्थानिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वेरीचे प्रा. करण पाटील यांना पीएच. डी. पदवी प्राप्त




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/ प्रतिनिधीः गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अंतर्गत असलेल्या एमबीए विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत असणारे प्रा. करण बाबासो पाटील यांनी पुण्यातील भारती विद्यापीठातून 'अ स्टडी ऑफ प्रॉब्लेम्स अँड प्रॉस्पेक्ट्स ऑफ प्रायव्हेट शुगर इंडस्ट्री इन सोलापूर डिस्ट्रीक्ट्र' या विषयावर शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च असणारी पीएच. डी. पदवी संपादन केली असून या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

स्वेरीच्या प्रा. करण बाबासो पाटील यांना भारती विद्यापीठ पुणे अंतर्गत असलेल्या अभिजित कदम इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अँड सोशल सायन्स, विजापूर रोड, सोलापूर मध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले डॉ. अकबरसाहेब बी. नदाफ यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. करण पाटील स्वेरीच्या एम.बी.ए विभागात गेल्या १० वर्षांपासुन प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. ज्ञानदानाबरोबरच डॉ. करण पाटील हे स्वेरीचे प्रवेश प्रक्रिया अधिष्ठाता तसेच वसतिगृहाचे चीफ रेक्टर म्हणून काम पाहतात. इंग्रजी व मराठी भाषेवर त्यांचे उत्तम प्रभुत्व असल्यामुळे त्यांच्या कार्यातून काम करण्याची विशेष कसब दिसून येते. डॉ. करण पाटील यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अशा जवळपास ६ परिषदांमध्ये सहभाग घेवून आपले संशोधनपर पेपर्स सादर केले आहेत तसेच वेगवेगळ्या जर्नल्समध्ये त्यांनी एकूण १४ रिसर्च पेपर्स प्रकाशित केले आहेत. त्यांच्या या संशोधनामुळे 'मॅनेजमेंट स्टडीज' या क्षेत्रातील व्यवसायांना नवीन दिशा मिळणार आहे. डॉ. पाटील यांना अभिजित कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड सोशल सायन्स, विजापूर रोड सोलापूरचे संचालक डॉ. एस.बी. सावंत, स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्यासह इतर प्राध्यापकांचे सहकार्य लाभले आहे.

> **'मॅनेजमेंट स्टडीज' या क्षेत्रातील व्यवसायांना मिळणार नवीन दिशा**

प्रा. करण पाटील यांनी पीएच. डी. प्राप्त केल्याबद्धल त्यांचा स्वेरीतर्फे महाराष्ट्र शासनाच्या तंत्रशिक्षण विभागाचे माजी संचालक, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे (एमपीएससी) माजी सदस्य त्याचबरोबर, स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ. एन. बी. पासलकर यांच्या हस्ते डीआरडीओ तथा डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन (संरक्षण, संशोधन आणि विकास संघटना) चे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. अशोक नगरकर, बी.ए.आर. सी.चे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ.व्ही के सुरी, डॉ.विजय कुलकर्णी, स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, स्वेरीचे माजी अध्यक्ष व विश्वस्त धनंजय सालविठ्ठल, विश्वस्त एच.एम. बागल, विश्वस्त बी. डी.रोंगे, आदी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सत्कार करण्यात आला. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, विश्वस्त व पदाधिकारी, अभियांत्रिकी पदवीच्या डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी. मणिवार, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस. व्ही. मांडवे, सर्व अधिष्ठाता, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केल्याबद्धल डॉ. करण पाटील यांचे अभिनंदन केले आहे.

# निफाड नगरपंचायतच्या वतीने मतदान जन जागृती मोहीम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणुक आयोगाच्या निर्देशानुसार, मा.जिल्हाधिकरी सो., मा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निर्देशानुसार निफाड शहरात मुख्याधिकारी अमोल चौधरी यांचे मार्गदर्शनाखाली मतदान जनजागृती मोहिमेस सुरुवात झाली.

१२१ निफाड, विधानसभा मतदारसंघा अतंर्गत मतदार जनजागृतीचा भाग म्हणुन निफाड शहरात स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदारांची प्रतिज्ञा प्रसिद्ध करण्यात आलेली असुन शहरात विविध ठिकाणी याबाबत प्रसिद्ध फलक व सेल्फी पॉइंट देखिल लावणेत आलेले आहे.




त्यानुषंगाने आज कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालयात प्रत्यक्ष जाऊन विद्यार्थ्यांमध्ये मतदान करणेविषयी जनजागृती करण्यात आली तसेच आज निफाड शहरात आठवडा बाजारात आलेले स्थानिक, इतर आजुबाजुच्या गावातुन आलेले व्यापारी, फ़ळ-भाजी विक्रेते, मच्छी मार्केट, निफाड पोस्ट ऑफ़िस या ठिकाणी निफाड नगरपंचायत मधिल अधिकारी व कर्मचारी यांनी नागरिकांमध्ये मतदान करणेविषयी व त्याचे महत्व सागुंन त्यांना याबाबत माहिती देण्यात येऊन जनजागृती करण्यात आली.

या उपक्रमास सर्व नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळालेला आहे. सदर मोहिमेत निफाड नगरपंचायतीचे कार्यालय अधिक्षक गुलाबराव नवले, कर प्रशासकीय अधिकारी शरद बोडके, लिपिक शरद काकुळते, सभा लिपिक रतन खालकर, शिपाई विपुल सैंदे व इतर उपस्थित होते.

# लॅण्डमार्क ग्रुप व डॉक्टर्स फॉर यु संस्थेच्या वतीने सामाजिक आरोग्य कल्याण कार्यक्रमाचे उद्‌घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



भिवंडी प्रतिनिधी/ मिलींद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा येथे लॅण्डमार्क गृपच्या सि. एस. आर. उपक्रमाद्वारे वडॉक्टर्स फॉर यु संस्थेच्या सहयोगाने सामाजिक आरोग्य आणी कल्याण कार्यक्रमाचे उद्घाटन विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात करण्यात आले.

डॉक्टर्स फॉर यु आणी लॅण्डमार्क गृप सि. एस. आर. यांच्या संयुक्त विद्यमाने पडघा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अखत्यारीत असलेल्या २० गाव, खेडी, पाड्यामध्ये फीरत्या दवाखान्यामार्फत मोफत आरोग्य सेवा व जनजागृती कार्यक्रम राबविणार आहेत त्याचा फायदा गांवकरी, नागरीक व स्थलांतरीत मजुर यांना होणार आहे. त्यासाठी एक छोटेखानी उद्घाटन कार्यक्रम ग्रामसचीवालय सभागृहात नुकताच घेण्यात आला यावेळी उपस्थित लॅण्डमार्क गृपचे प्रविण कुमार मॅनेजर सप्लाय मॅक्स फैशन, अजय कुमार तालुका वैद्यकीय अधिकारी पंचायत समिती भिवंडी डॉ. संदीप गडेकर डॉक्टर्स फॉर यु. संस्थेचे सेक्रेटरी साकेत झा यांच्या हस्ते द्वीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तर यावेळी भोकरी गावाच्या सरपंच प्रगती पाटील डॉ. अजमेरा, प्रियांका, विपेश पाल, रिया शिगवण, महेश सारुक्ते व आशा सेवीका उपस्थीत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतुल मस्के यांनी केले.



# भूमिपूजन मध्ये पहिला मान सतुबाई देवीचा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/पत्रकार नामदेव निर्मळे

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे भूमिपूजन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सकाळी थोडी पावसाने हजेरी लावल्यामुळे तारांबळ उडाली. सतूबाई देवी ही गेली १५० वर्षा पासून आहे. सतुबाई देवीच्या परिसरातील शेतकरी पहिल्यांदा सतूबाईला नैवेद्य, पूजा, करूनच आपल्या शेतामध्ये भूमिपूजन करतात ही परंपरा पिढ्यानपिढ्या चालत आलेली आहे. यावेळी असंख्य महिलांनी हजेरी लावली होती.

## ६९ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

# अस्पृश्य हिंदू म्हणून जन्माला आलो, पण हिंदू म्हणून मरणार नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १३ ऑक्टोबर १९३५ ला येवला येथे मी अस्पृश्य हिंदू म्हणून जन्माला आलो, पण हिंदू म्हणून मरणार नाही. असा निर्वाणीचा इशारा दिला होता. त्या विधानाच्या ८९ व्या वर्धापनदिनानिमित्त साप्ताहिक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना एड. ए. एच. धुपे म्हणाले की, डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्माच्या द्वेषातून बुद्ध धम्म स्वीकारला नाही तर किमान समानतेची वागणूक मिळावी, अशी अपेक्षा होती. ख्रिश्चनात कॅथोलिक, प्रोटेस्टंट आणि इस्लाम मध्ये शिया व सुन्नी तसे बौद्धात हिनयान, महायान अस्तित्वात असताना धर्मांतरीतांनी मात्र नव्यानेच नवयान शोधून काढले. परिणामी आपली वाटचाल विभाजनाकडे गेली. नवबौद्ध ही संकल्पना पुढे आली. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर समाजाला एकसंघ ठेवणारे सक्षम नेतृत्व उदयास न आल्याने सारा भारत बौद्धमय करण्याचे स्वप्न अपूर्ण राहिले. सर्वोत्तम बुद्धाला समजून घेण्यासाठी पात्रता सुद्धा सर्वोत्तम असावी लागते, ती आपल्यात निर्माण न होऊ शकल्याने आपण उचित ध्येय गाठू शकलो नाही.

> **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विपश्यना का नाकारली? असा प्रश्न विचारणारी पुस्तिका डॉ. यशवंत मनोहरांनी लिहिली आहे. ते आपण नीट समजून घेतली पाहिजे. शील आणि सौजन्य नसेल तर माणूस हा हिंस्र पशू पेक्षाही क्रूर आणि भितीप्रद समजण्यात यावा असे बाबासाहेब म्हणाले होते. याची जाणीव ठेवून आपण धम्माचे आचरण केले पाहिजे. जेणेकरून आपणास भारत बौद्धमय करण्याच्या दिशेने मार्गक्रमण करता येईल. परिणामी चलो बुद्ध की और चे स्वप्न साकार होईल. करिता सर्व अनुयायांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अपेक्षेप्रमाणे या चळवळीच्या उत्थानासाठी आपल्या उत्पन्नाचा, संसाधनाचा विसावा हिस्सा म्हणजे पाच टक्के आंबेडकराईट सर्व्हिस टॅक्स (एएसटी) प्रदान केला पाहिजे. म्हणून या प्रासंगिक विधानाच्या अनुषंगाने चर्चा आयोजित केली आहे.**

याप्रसंगी नंदकुमार जोगदंड म्हणाले की, आपल्या हातातील गंडे, दोरे गुलामीचे प्रतिक आहेत. विज्ञानवादी बुद्ध धम्म आपल्या वर्तनातून दिसायला हवा. बुद्धांनी विपश्यना करून बघितली होती मात्र करायला सांगितली नव्हती म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी विपश्यना का नाकारली? हे समजून घेतले पाहिजे. एड. प्रभाजी रणभरे म्हणाले की, मनुष्यमात्रास उपयोगी पडेल अशी विचारधारा जोपासली पाहिजे.

मिलिंद बागूल म्हणाले की, आज शहरात केंद्रीय मंत्री रिजिजू आले होते, तिथे बिमॅट मार्फत २५ प्रतिनिधी उपस्थित होतो परंतु तीनच जणांना आपले म्हणणे मांडता आले. यावरून आपले म्हणणे मांडण्याची तयारी करण्यासाठी अशा कार्यशाळांची नितांत आवश्यकता आहे. डॉ. व्ही. एच. कांबळे म्हणाले की जगातील अनेक धर्म अंधश्रद्धा पाळतात, मात्र बुद्ध समानता पाळतो म्हणून आपण बुद्धाला स्विकारले पाहिजे. धनराज गोंडाणे म्हणाले की, केळुसकर गुरुजींनी आंबेडकरांना बुद्ध चरीत्र भेट दिल्यापासून त्यांच्या मनावर बुद्धाचा प्रभाव होता. त्यामुळे त्यांनी अभ्यासाअंती बुद्धत्व स्विकारले. आपण त्रिरत्नाचा अंगिकार केला पाहिजे. आपण बुद्धत्व कितपत स्विकारले? याचे परिक्षण केले पाहिजे.

प्रमुख वक्ते इंजिनिअर हिरामण पाटील म्हणाले की, समाजातील स्पृश्यांनी स्वतःत बदल केला तर समाजात निश्चित बदल होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समतेसाठी आंदोलन केले. धर्मांतराच्या घोषणेनंतर २१ वर्षांनी अंमलबजावणी केली. म्हणून अनुयायांनी शीलाचे पालन करून धम्माचरण केले पाहिजे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रथमतः मी त्या वर्तमानपत्राच्या सर्व संपादकाचे व त्यांच्या टीमचे मनपूर्वक आभार व्यक्त करतो ज्यांनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या बातम्या प्रकाशित केल्या आहेत. १३ ऑक्टोबर १९३५ ला संपन्न झालेल्या दलित वर्ग परिषदेत हिंदू धर्मातील अस्पृश्य गणल्या गेलेल्या वर्गाने हिंदू धर्माचा त्याग करून ज्या धर्मात समानतेचे हक्क मिळतील त्या धर्मात प्रवेश करण्याविषयीचा ठराव मंजूर करण्यात आला होता. त्यात आंबेडकर म्हणाले की, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय अशा सर्वच क्षेत्रात अस्पृश्यांचा छळ होत असताना काळाराम मंदिराच्या प्रवेशातून समानता स्थापित करण्याचे प्रयत्न व सत्याग्रहाचा उपाय उच्च वर्णीय हिंदूची मने वळविण्यास निरुपयोगी ठरल्याने आपणास धर्मांतराची घोषणा करणे भाग पडले. ज्याचे समाजावर दूरगामी परिणाम झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जात पात तोडक मंडळांनी लाहोरच्या परिषदेला मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित केले होते. मात्र आयोजकांत मतभेद झाल्याने त्यांनी डॉ. आंबेडकरांना लिखित स्वरूपात भाषण उपलब्ध करून देण्याची विनंती केली होती. ती विनंती मान्य करून भाषण उपलब्ध करून दिले जे वाचकांना उपलब्ध करून दिले जाणार होते. परंतु आयोजकांनी भाषणात सुधारणा सुचविल्या त्यावर बाबासाहेब आंबेडकरांनी काना तर काय वेलांटी सुद्धा बदलता येणार नाही, अशी कणखर भूमिका व्यक्त केली. परिणामी आयोजकांनी परिषद पुढे ढकलली मात्र ती परिषद पुढे झालीच नाही म्हणून प्रस्तावित भाषण नंतरच्या काळात जातीचे निर्मूलन या नावाने पुस्तक रूपाने प्रकाशित केले आहे. तर मग आपण अनुयायी म्हणून अशा उच्च कोटीची कणखर भूमिका पार पाडतो काय? राष्ट्रसंत तुकडोजी महाराज बुद्धाचे अनुषंगाने म्हणाले होते की, हाती न घेता तलवार बुद्ध राज्य करी जगावरी, त्याशी कारण एक प्रचार प्रभावशाली. याची जाणीव ठेवून आपण बुद्धत्वाचा प्रचार प्रसार केला पाहिजे. केळुसकर गुरुजींनी २८ व्यक्तीमत्त्वावर चरीत्र लिहिले असताना केवळ बुद्धाचेच चरीत्र का भेट दिले असावे?याचेही आकलन केले पाहिजे. म्हणून जाणीवपूर्वक डॉ. आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ ला केळुसकर गुरुजींच्या परिनिर्वाण दिनी धर्मांतर घडवून आणले असावे.



या कार्यशाळेला डॉ. व्ही. एच. कांबळे, चित्रकार नंदकुमार जोगदंड, उद्योजक संतोष निकम, उद्योजक अनिल दत्ता सावते, उद्योजक मिलिंद बागूल, इंजिनिअर किशोर पाटील, एड. प्रभाजी रणभरे, एड. अनिल धुपे, धनराज गोंडाणे, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

## थोडक्यात...

### न्याय आपल्या दारी': तालुक्यात फिरते लोक अदालत व कायदेविषयक शिबिर

पंढरपूर : समाजातील तळागाळातील लोकांना न्याय मिळावा हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून सर्वोच्च न्यायालय यांच्या 'न्याय आपल्या दारी' या संकल्पनेतून सुरू केलेल्या फिरते लोक अदालत व कायदेविषयक शिबिराचे आयोजन राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या आदेशान्वये पंढरपूर तालुक्यातील गोपाळपुर, वाखरी व गुरसाळे या गावांमध्ये दि. २५ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत करण्यात आलेले आहे. फिरते लोक आदालत तालुक्यातील गोपाळपुर, वाखरी व गुरसाळे गावात फिरून न्यायालयात प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात येणार आहेत. तसेच कायदेविषयक शिबिराद्वारे जनजागृती केली जाणार आहे. सदर फिरते लोक अदालत यशस्वी करण्यासाठी संबंधित गावातील नागरिकांनी सहकार्य करावे व जास्तीत जास्त लाभ घेवून तडजोड योग्य प्रकरणे आपसात मिटवावी असे आवाहन. तालुका विधी सेवा अध्यक्ष समिती , तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश डि. एन. सुरवसे यांनी केले आहे.

### दुचाकी वाहनांसाठी आकर्षक नोंदणी क्रमांक राखून ठेवणेकरिता अर्ज करण्याचे आवाहन

सोलापूर (जिमाका): प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर या कार्यालयात लवकरच दुचाकी वाहनांसाठी नवीन मालिका सुरु होणार असून ,वाहनांची नवीन मालिका चालू होण्याच्या दिवशी प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये मोठ्या प्रमाणावर इच्छुकांची गदर्दी होते व त्यामुळे कार्यालयीन व्यवस्थेवर त्याचा ताण पडतो व बऱ्याच वेळा नागरिकांनाही याचा त्रास होतो. नागरिकांना होणारा त्रास कमी व्हावा व त्यांना हवा असणारा आकर्षक नोंदणी क्रमांक उप-लब्ध असल्यास त्यांना सुलभतेने तो मिळावा, यासाठी ज्या दुचाकी वाहन मालकांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहीत शुल्क भरुन हवे असतील त्यांनी दिनांक २१ऑक्टोबर २०२४ रोजी सोबतच्या वेळापत्रकानुसार कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या दरम्यान विहीत नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या नवीन नोंदणी विभागात डीडी (केवळ क्र १६ अन्वये जारी झालेले डी डी), पत्त्याचा पुरावा, आधार लिंक मोबाईल नंबर, ओोळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह स्वतः जमा करावा. सदर डीडी फक्त Dy R.T.O. Solapur यांच्या नावे नॅशनलाईज शेडयुल्ड बँकेचा असावा. या व्यतिरिक्त इतर नावाचे डीडी बाद ठरवले जातील.

# सर्व नोडल अधिकारी यांनी निवडणूक कामकाजाची जबाबदारी अत्यंत दक्ष राहून पार पाडावी

## जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्हास्तरावर नियुक्त करण्यात आलेल्या सर्व संबंधित नोडल अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपवण्यात आलेली जबाबदारी अत्यंत दक्ष राहून पार पाडावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.




जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित सर्व नोडल अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत ते मार्गदर्शन करत होते. यावेळी निवासी उप जिल्हाधिकारी मनीषा कुंभार उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निराळी उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्यासह सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सर्व संबंधित निवडणूक नोडल अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये अकरा मतदारसंघातील एकूण ३ हजार ७२३ मतदान केंद्रावर अत्यंत चांगल्या सोयीसुविधा मतदारांना उपलब्ध करून द्याव्यात. यासाठी नियुक्त केलेले नोडल अधिकारी यांनी ग्रामीण व शहरी भागात सर्व मतदान केंद्रावर सुविधा उपलब्ध करून घेण्याबाबतची कार्यवाही करावी. त्याप्रमाणे सर्व संबंधित अतिरिक्त निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्रिसायडिंग ऑफिसर च्या माध्यमातून प्रत्येक मतदान केंद्रावरील किमान दहा मतदारांना लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये मतदान केंद्रावर देण्यात आलेल्या सोयी सुविधा बाबत प्रश्न विचारून माहिती घ्यावी. तसेच या मतदान केंद्रावर निवडणूक कर्मचारी अधिकारी यांची वर्तणूक कशी होती याबाबत ही माहिती घ्यावी. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत प्रत्येक मतदान केंद्रावर आलेल्या सूचनेप्रमाणे अधिकच्या सुविधा उपलब्ध करणे सोयीचे होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील एकूण मतदान केंद्रापैकी ५० टक्के मतदान केंद्रावर आयोगाच्या सूचनेप्रमाणे वेबकास्टिंग करण्यात येणार आहे. तरी वेब कास्टिंग करणाऱ्या महापालिकेच्या सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना अत्यंत सूक्ष्म प्रशिक्षण देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले. राजकीय पक्ष व उमेदवारांना जिल्हास्तरावरून देण्यात येणाऱ्या विविध परवानग्याच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या एक खिडकी योजनेअंतर्गत संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी अत्यंत दक्ष राहून काम करावे व विहित वेळेत त्यांना परवानगी मिळतील याबाबत दक्षता घ्यावी असे त्यांनी सूचित केले.

**सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त अधिकारी कर्मचारी यांचा प्रशिक्षणाचा कार्यक्रम नियोजित करून अत्यंत सूक्ष्मपणे प्रशिक्षण द्यावे. प्रशिक्षणासाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. जागाही उत्तम असावी. दोन दिवस प्रशिक्षण कार्यक्रम ठेवून चार सत्र घ्यावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या. तसेच स्विफ्ट अंतर्गत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जेंडर रेशो वाढवण्यासाठी केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी यावेळी घेतली. त्याप्रमाणेच दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणाऱ्या मतदाना दिवशी मतदानाची टक्केवारी कशा पद्धतीने वाढेल यासाठी मतदार जनजागृती स्वीपचे नोडल अधिकारी व सर्व संबंधित निवडणूक अधिकारी कर्मचारी यांनी करावी.**

प्रत्येक विधानसभा मतदारसंघात स्ट्राँग रूम निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे व्यवस्थित करण्यात आलेल्या आहेत का याबाबत खात्री करण्यासाठी २१ ऑक्टोबर रोजी अप्पर जिल्हाधिकारी चार विधानसभा मतदारसंघात, महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर तीन, तर आपण स्वतः चार विधानसभा मतदारसंघातील स्ट्राँग रूम ची पाहणी करणार असल्याचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले. त्याप्रमाणेच सर्व निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे तंतोतंतपालन होण्यासाठी आयोगाने उपलब्ध करून दिलेले नियमावली पुस्तकांचे वाचन करावे, अशी सूचना त्यांनी केली.

यावेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी मनुष्यबळ प्रशिक्षण व्यवस्थापन, साहित्य व्यवस्थापन, वाहतूक व्यवस्था, सायबर सिक्युरिटी, स्वीप कार्यक्रम, कायदा व सुव्यवस्था, आदर्श आचारसंहिता कक्ष, खर्च समिती पोस्टल बॅलेट, कम्युनिकेशन प्लॅन, माध्यम कक्ष, निवडणूक निरीक्षक, दीव्यांग मतदार, मतदान केंद्रावर मूलभूत सुविधा, स्ट्राँग रूम आणि काउंटिंग सेंटर, वेब कास्टिंग, बॉर्डर मॅनेजमेंट, फूड मॅनेजमेंट, जिल्हा नियंत्रण कक्ष, वैद्यकीय सोयी सुविधा आदीसह अन्य सर्व नोडल अधिकारी यांच्या कामांची सविस्तर माहिती घेऊन मार्गदर्शक सूचना दिल्या.

## मोटर सायकल चोरी करणाऱ्या दोन अट्टल चोरटे जेरबंद; १० लाख ७० हजार किमतीच्या १८ मोटरसायकली हस्तगत




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहर पोलिसांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे दमदार कामगिरी करून चोरीला गेलेल्या दहा लाख ७० हजार किमतीच्या मोटरसायकली सह दोन विठ्ठल आरोपीस यश मिळवले आहे.

याप्रकरणी लखन शिवराय लोहारा रा. आळंदी रोड साई कॅम्प पुणे हा भटुंबरे गावामध्ये असल्याची माहिती मिळाल्य गुन्हे पोकीटीकरण शाखेने सापळा रुचून शहर पोलीस ठाणे ने यांनी पकडले.

अधिक चौकशी केल्यावर पंढरपूर शहरातील व पुणे शहर पिंपरी चिंचवड चोरी केल्याची कबुली दिली असून त्याची अशी आहे यावरून पोलिसांनी विनोद बळीराम घुले रा. कळंब जिल्हा धाराशिव याला देखील ताब्यात घेतले आहे.

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, सोलापूर ग्रामीण अधीक्षक प्रीतम यावलकर, सूचनेनुसार सह पोलीस उपाधीक्षक अर्जुन भोसले, पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, यांच्या मार्गदर्शनाखाली शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे चोरट्यांना मुद्देमालासह पकडण्यात यश मिळवले आहे. शरद कदम, बिपिन ढेरे, सुरज हेमाडे, नितीन पलूसकर, सचिन हेमाडे, नवनाथ माने, समाधान माने, बजरंग बिचुकले, निलेश आंबट, रतन जाधव कामगिरी करत चोरट्याने जेल बंद केली.

## श्री दत्त आश्रम संस्थान यांच्याकडून श्री विठ्ठल रुक्मिणी मातेस सोन्याचा तुळशी हार अर्पण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : श्री दत्त आश्रम संस्थान, जालना यांच्याकडून श्री विठ्ठल रुक्मिणी मातेस सोन्याचा तुळशी हार अर्पण केल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. सदर हार ११७ ग्रॅम ४०० मिली वजनाचा असून त्याची सुमारे ८ लाख ३१ हजार इतकी किंमत होत आहे. यावेळी विभाग प्रमुख ज्ञानेश्वर कुलकर्णी, संजय कोकीळ, सहाय्यक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी व सराफ गणेश भनगे उपस्थित होते

## २२ प्रतिज्ञाचे पालन बौध्द बांधवानी काटेकोरपणे केल्यास बुध्दं धम्मं घराघरात जाईल : बळीराम सोनवणे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

डॉ विनायक गायकवाड/पुरंदर प्रतिनिधी : विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ आक्टोंबर १९५६ रोजी नागपूर येथे आपल्याला तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या विज्ञानवादी बौध्दधम्मांची दिक्षा दिली, या धम्मांचे आचरण करताना २२ प्रतिज्ञांचे बौध्द बांधवांनी पालन केल्यास तथागतांचा धम्म घराघरात जाईल असे मतं पुरंदर तालुका रिपब्लिकन पक्षाचे नवनिर्वाचित अध्यक्ष बळीराम सोनवणे यांनी वर्षावास कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले,

सोनोरी ता.पुरंदर येथे दि. १७ आक्टोंबर रोजी वर्षावास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी बळीराम सोनवणे बोलत होते, यावेळी पुरंदर तालुका भारतीय बौध्द महासभेचे तालुका अध्यक्ष बाळासाहेब पोळ, भारतीय बौध्द महासभेचे अनिल मसने, प्रकाश सोनवणे लक्ष्मण लोंढे, दत्ता गायकवाड ,राजू लोंढे, ज्ञानोबा बनसोडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते,

कार्यक्रमाची सुरुवात तथागत भगवान गौतम बुद्ध, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आले, यावेळी त्रिसरण पंचशील बुध्दंपुजा गाथेचे पठण करण्यात आले, भारतीय बौध्द महासभेचे अनिल मसने यांनी धम्मंउपदेश दिला.

आषाढ पौर्णिमा ते आश्विन पौर्णिमा या महिन्यामध्ये भारतीय बौध्द महासभेच्या वतीने पुरंदर तालुक्यातील गावागावात जाऊन, बौध्दधम्माचा प्रचार आणि प्रसार केला जातो, यावेळी त्रिसरण पंचशील व इतर धार्मिक गाथेचे पठण करुन धम्मं उपदेशपर व्याख्यान सांगितले जाते, त्या अनुषंगाने सोनोरी येथील सामाजिक सभागृहात वर्षावास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी सोनोरी गावातील महिला व बौध्द अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते, यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले या पक्षाचे नवनिर्वाचित तालुका अध्यक्ष बळीराम सोनवणे, भारतीय बौध्द महासभेचे तालुका अध्यक्ष बाळासाहेब पोळ अनिल मसने, ज्ञानोबा बनसोडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मण लोंढे यांनी केले,



## मागासवर्गीय शिक्षक संघटनेकडून अक्कलकोट शिक्षण विभागला खुर्च्या भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : अक्कलकोट पंचायत समिती शिक्षण विभाग हा सोलापूर जिल्ह्यात मोठा क्षेत्र आहे या विभागात अक्कलकोट तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा कन्नड मराठी उर्दू असे एकूण. २५७ अंदाजित शाळा आहे व सर्व भाषिक मिळून ९६५ अंदाजित शिक्षक आहे.



या शिक्षकामध्ये काही शिक्षक दुर्धर आजार ग्रस्त आहेत , काही शिक्षक सेवानिवृत्त प्रस्ताव देण्यासाठी पंचायत समिती शिक्षण विभागाकडे येत असतात, काही गरोदर महिला शिक्षिका कार्यालयात येतात, काही ना काही कारणमुळे रोज पंचायत समिती अक्कलकोट येथे ये जा करत असतात त्या शिक्षकांना शिक्षण विभाग कार्यालयात आल्यानंतर बसण्यासाठी खुर्च्या नसल्याने मानसिक त्रास सहन करावा लागत होता, कार्यालयात दहा-बारा खुर्च्या शिक्षकांसाठी होते ते खुर्च्या प्रभारी गटशिक्षण अधिकारी अरबाळे यांनी सर्व खुर्च्या त्यांचे स्वतःचे कार्यालयात दोरीने बांधून ठेवले आहे.

कर्मचाऱ्याकडे शिक्षक कामानिमित्त आल्यानंतर त्या ठिकाणी एक ही खुर्च्या बसण्यासाठी उपलब्ध नाही , शिक्षकांना आपला देशात गुरु म्हणून मानतात, त्या गुरूंचा कार्यालयातच बसण्यासाठी कर्मचाऱ्यांना खुर्च्या आहे अधिकाऱ्यांना बसण्यासाठी खुर्च्या आहे फक्त शिक्षक व मुख्याध्यापक यांच्यासाठी खुर्च्या नाही, एखादा कर्मचारी कार्यालयात नसेल तर त्यांच्या खुर्चीवर शिक्षकांना बसण्याचे परवानगी नाही या प्रकारचे सूचना गटशिक्षणाधिकारी यांनी कार्यालयात भिंतीवर चिटकवलेले आहे, असे अनेक प्रकारचे त्रास शिक्षक यांना सहन करावे लागत आहे, खुर्च्या नसल्याने शिक्षक ताटकळत उभा राहिलेले बघून व गटशिक्षणाधिकारी यांनी मुख्याध्यापक व शिक्षक कर्मचाऱ्यांच्या खुर्चीवर बसू नये असे कार्यालयात नोटीस लावल्याचे बघून मागासवर्गीय शिक्षक संघटना शाखा अक्कलकोट अध्यक्ष महांतेश्वर कट्टीमनी यांनी संघटनेच्या वतीने शिक्षकांना बसण्यासाठी सहा खुर्च्या भेट दिले आहे.

यावेळी पंचायत समिती कार्यालयाचे अधीक्षक श्री दयानंद परिचारक शिक्षण विभागाचे शेत संधी, श्री विजय पाटील श्री मठ श्री थोरात मागासवर्गीय शिक्षक संघटना अध्यक्ष महांतेश्वर कट्टीमनी आणि श्री मल्लिनाथ कांबळे सर आधी मान्यवरांचा उपस्थितीत कार्यालयास खुर्च्या भेट देण्यात आले.

इंटरनॅशनल डे फॉर डिझास्टर रिस्क रिडक्शन — परिसंवादातील सूर

## आपत्तीबाबत युवकांची भूमिका ही काळाची गरज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर /प्रतिनिधी : पर्यावरणाच्या संतुलनामुळे व हवामान बदलामुळे येणाऱ्या नैसर्गिक आपत्ती व मानवी वर्तनामुळे येणाऱ्या संभाव्य आपत्ती व आपत्ती आल्यानंतर होणाऱ्या परिणामांवर प्रतिबंधक उपाययोजना याबाबत जनजागृती होणे आवश्यक असून धोक्याची जाणीव होणे, तसेच सामाजिक जाणिवेतून मदत करणे, मानसिकदृष्ट्या सक्षम होणे, त्यासाठी आहार व व्यायाम नियमित करणे, आपत्ती व आपत्ती व्यवस्थापनाबाबत अभ्यास करणे, याची सुरुवात स्वतःपासून करावी. आपत्ती येण्यापूर्वी व आल्यानंतर काय करावे व काय करू नये याची स्पष्टता असावी, अभ्यास असावा.



यामध्ये राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची भूमिका महत्त्वाची असून युवावर्ग व सामाजिक संस्थांचे सहकार्य ही आवश्यक असते. मात्र युवकांनी आपली भूमिका ही बजावणे त्यांचे कर्तव्य आहे. असा सूर इंटरनॅशनल डे फॉर डिझास्टर रिस्क रिडक्शन निमित्त आयोजित परिसंवादात निघाला.

भवानी पेठ येथील एस.व्ही.सी.एस. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सभागृहात फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा स्प्रिंट ४ - मानवतावादी प्रकल्प व सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने परीसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

या परिसंवादात साधन व्यक्ती म्हणून डॉ. राजीव प्रधान यांनी 'आपत्तीचे प्रकार व जनजागृती' यावर, अर्चना बिसोई यांनी 'आपत्ती व्यवस्थापन, शासनाची भूमिका व युवकांचा सहभाग' यावर, प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी 'आपत्तीचे परिणाम व युवकांची भूमिका' यावर तर प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी 'आपत्ती व्यवस्थापनात सामाजिक संस्था व युवकांची जबाबदारी' यावर विचार व्यक्त केले.

या परिसंवादात एस. व्ही. सी. एस. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे ४५५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी एस. व्ही. सी. एस. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य राम ढाले हे होते.

यावेळी सोलापूर महानगरपालिका अग्निशामक दलाचे अधिकारी रावसाहेब सलगर यांनी माहिती दिली व त्यांचे सहकारी महेश गोंड, पंकज माळी, कल्याणी धप्पाधुळे, भारत सलगर या कर्मचाऱ्यांनी अग्निशमनचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखवले.

प्राचार्य राम ढाले यांनी स्वागत केले. डॉ. नभा काकडे यांनी आभार मानले तर सूत्रसंचालन एफ. पी. ए. आय. सोलापूर शाखेचे शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी केले.